नि.फौ.ख.क्रं.६७/२०२२
सरकार वि. प्रभाकर.
**नि.क्रं.२८.**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०४ यांची जबानी.</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की–

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | भाऊराव केवळराम मेंढे, |
| वय सुमारे | : | ५८ वर्ष, व्यवसाय– पोलीस पाटील, |
| निवासस्थान | : | बोरगाव, |
| तालुका | : | पवनी, जिल्हा: भंडारा. |

**सरतपास — सहा. सरकारी वकील श्रीमती नवनागे मॅडम यांचेमार्फत–**

१. पोलीसांनी मला पंचनाम्याकरीता पोलीस ठाण्याला बोलावले होते. त्यापूर्वी मला सुचनापत्र दिले होते. आता मला सुचनापत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्रं.२९** देण्यात येते.

२. माझ्या समक्ष सॅनडीक्स कंपनीचा एक पेनड्राईव्ह अश्वीन शहारे यांच्याकडुन जप्त केला. त्याचा जप्ती पंचनामा माझ्या समक्ष तयार केला. आता मला तो जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्रं.३०** देण्यात येते.

**सरतपास संपला.**

**<u>उलट तपास आरोपीतर्फे वकील श्री. डी. एल. देशमुख यांच्यामार्फत सुरू</u>.**

३. मला सुचनापत्र किती वाजता दिले व कुठे दिले हे मला आठवत नाही. पेन ड्राईव्हमध्ये काय होते हे मला दाखविण्यात आले नाही. मला कम्प्युटरमध्ये पेनड्रॉईव्ह लावुन बयान नोंदविले होते असे दाखविले नव्हते. तो पेनड्राईव्ह अश्वीन शहारे पोलीस याच्याकडुन जप्त केला होता. अश्वील शहारे याच्याकडे पेनड्राईव्ह कसा व कोठुन आला हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला पोलीस ठाण्यामध्ये बोलावले तेथेच माझ्या सुचनापत्रावर व पंचनाम्यावर सह्या घेतल्या. मी बोरगाव या गावचा पोलीस पाटील आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांच्या आदेशानुसार आधीच लिहुन ठेवलेल्या पंचनाम्यावर सही केली.

**<u>उलटतपास संपला.</u>**

**<u>फेरतपास – काही नाही</u>.**

| | |
|---|---|
| समक्ष | श्रवणोत्तर स्विकृत |
| स्वा/– | स्वा/– |
| (अ. वि. पंडित) | (अ. वि. पंडित) |
| न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., पवनी. | न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., पवनी. |
| ०१/१२/२०२५ | ०१/१२/२०२५ |